# उपसंहार

# उपसंहार

१८५७ साली प्रसिध्द झालेली बाबा पद्मनजी यांच्या 'यमुनापर्यटन' या मराठीतील पहिल्या स्वतंत्र कादंबरीने सामाजिक कादंबऱ्याची मुहूर्तमेढ रोवली. या परंपरेतील एक लेखक भा. वि. तथा मामासाहेब वरेरकर यांच्या कादंबऱ्या खऱ्या अर्थाने सामाजिक कादंबऱ्या आहेत. मामा वरेरकरांनी आपल्या साहित्यनिर्मितीला १९२० पूर्वी प्रारंभ केला आणि स्वातंत्र्योत्तर काळातही मामा वरेरकरांनी लेखन केले असले तरी १९२० ते १९४५ हा कालखंड त्यांच्या साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो.

मामा वरेरकरांना नाटककार म्हणून ओळखळे जाते. परंतु यशस्वी नाटककार हा लीलया कादंबरी लिहू शकतो हे सिध्द करून दाखण्यासाठी मामा वरेरकरांनी १९२६ साली लिहिलेल्या 'चिमणी' ह्या कादंबरीचाच त्यांची पहिली कादंबरी म्हणून उल्लेख केला जातो. लघुकथा, कादंबरी आणि नाटक या ललित साहित्यांच्या तिन्ही क्षेत्रात मामा वरेरकर यांनी केलेले लिखाण विपुल आहे.

मामा वरेरकरांनी आपल्या कादंबऱ्यामधून प्रामुख्याने बालविवाह, स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, पुनर्विवाह, मजुरांचे प्रश्न यासारख्या प्रश्नांचा समावेश केलेला दिसतो. मामा वरेरकर हे जीवनासाठी कला मानणारे समाजभिमुख लेखक होते. त्यांच्या कादंबऱ्यातून प्रकट होणाऱ्या जीवनदृष्टीचा विचार करता समाजातील सर्व स्तरावरील विषमता नाहीशी व्हावी असा वरेरकरांचा दृष्टिकोन होता असे दिसून येते.

मामा वरेरकरांनी आपल्या कादंबऱ्यातून ग्रामीण व शहरी दोन्ही जीवन पध्दतीचा समावेश केलेला दिसून येतो. आपल्या कादंबऱ्यातून सर्व जाती, धर्म, पंत असणाऱ्या स्त्रियांची विविध रूपे त्यांनी दाखवली आहेत. जागी झालेली आणि जागी होऊ पाहणारी

स्त्री मामा वरेरकरांनी आपल्या कादंबऱ्यामधून रेखाटली आणि जागृत स्त्रीचे व तिच्यातील सुप्त सामर्थ्याचे आणि बंडखोरीचे तत्त्वज्ञान आवेशाने पुढे आणले. समाजामध्ये जर खऱ्या अर्थाने बदल घडवून आणायचा असेल तर तो स्त्रियाच आणू शकतात असे मामा वरेरकरांना वाटत होते.

मामा वरेरकरांनी आपल्या कादंबऱ्यातून स्त्री–शिक्षण, स्त्री–सुधारणा, ह्या प्रमुख विषयासंबंधी विचार मांडले आणि स्त्री–जीवनातील समस्यांवर समाजाचे लक्ष केंद्रित केले. स्त्री ही नवऱ्याची गुलाम नसावी तर तिला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असावे. स्त्रियांच्या कर्तृत्वाला वाव मिळावा, स्त्री–पुरूषामध्ये समानता असावी समाजामध्ये कुटुंबव्यवस्था, विवाहपध्दती कशा प्रकारची असावी या प्रश्नासंबंधीचे विचार मामा वरेरकरांनी आपल्या कादंबऱ्यातून मांडले आहेत.

मामा वरेरकरांच्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या जीवनदृष्टीचा विचार करता 'विधवाकुमारी' व 'गोदू गोखले' ह्या दोन कादंबऱ्या महत्त्वाच्या वाटतात. 'विधवाकुमारी' ह्या कादंबरीपासून स्त्रियांचे कैवारी म्हणून साहित्य क्षेत्रात मामा वरेरकरांना लौकिक मिळाला होता. 'विधवाकुमारी' ह्या कादंबरीमध्ये मामा वरेरकरांनी बाल विधवांची करूण स्थिती वर्णिलेली आहे. 'विधवाकुमारी' या कादंबरीत वयाच्या अकराव्या वर्षी त्रेपन्न वर्षाच्या बिजवराशी लग्न होऊन वैधव्य आलेल्या मथूची जीवनकहाणी व्यक्त केली आहे. मथू सारख्या स्त्रीचा रूढीग्रस्त समाजाकडून जो मानसिक छळ होतो. त्याचे चित्रण आले आहे. व त्याद्वारे तत्कालीन समाजात स्त्रीला कसे दुय्यम स्थान होते याची मामा वरेरकरांनी जाणीव करून दिली आहे. विधवा झालेल्या स्त्रीला शिक्षणामध्ये कशा प्रकारची विघ्ने येतात हे मामा वरेरकरांनी दाखवले आहे.

केशवपन, पुनर्विवाह, प्रेमविवाह यांच्या इतका क्रांती करणारा कुंकवाचा विषय महत्त्वाचा नसला तरी तितक्याच तीव्रतेने

वरेरकर यांनी तो मांडला आहे. हिंदू समाजातील अनिष्ट चालीरीतीचा स्त्रियांवर कशा प्रकारे परिणाम होतो हे वरेरकरांनी 'विधवाकुमारी' ह्या कादंबरीतून दाखवले आहे. 'विधवाकुमारी' ह्या कादंबरीमध्ये प्रामुख्याने पुनर्विवाहाचा प्रश्न मांडलेला आहे. मथू प्रमाणेच इतर व्यक्तीच्या संसाराची चित्रे पाहिली की समाजातील विवाहपध्दतीमुळे व्यक्तिजीवन कसे गुदमरून जाते हे लक्षात येते.

समाजामध्ये असणाऱ्या अनिष्ट चालीरीतीमुळे बालविधवेचे दु:ख ऐकल्यानंतर अंत:करणाला घरे पडल्यावाचून राहत नाहीत. विधवा स्त्री ही विधवा आहे हे कळण्यासाठी विधवा स्त्रीला कुंकू लावू दिले जात नाही. तिचे सौंदर्य टिकून राहू नये म्हणून तिच्या डोक्यावरील केस काढून तिला विद्रूप केले जाते. विधवा स्त्रीला अंगावर दागिने घालू दिले जात नाही. सण समारंभामध्ये तिला सहभागी करून घेत नाहीत. परंतू 'विधवाकुमारी' ह्या कादंबरीची नायिका मथू ही या सर्व बंधनावर मात करते. मथूच्या मते जे कुंकू आपणास आपल्या जन्मापासून मिळाले ते हिरावून घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. म्हणूनच मथू विधवा असूनही कुंकू लावते. 'विधवाकुमारी' कादंबरी प्रसिध्द झाल्यानंतर महाराष्ट्रात विधवा स्त्रिया कुंकू लावू लागल्या आहेत. 'कोण म्हणतो साहित्याचा परिणाम होत नाही म्हणून?' हे भा. वि. वरेरकरांनी काढलेले विधान आज खऱ्या अर्थाने सत्यात उतरलेले पहावयास मिळते.

वरेरकरांनी १९३२—३३ साली 'गोदू—गोखले' ही कादंबरी लिहिली. वरेरकरांच्या सर्व नायिकात सर्वात बंडखोर नायिका म्हणून 'गोदू—गोखले' कादंबरीची नायिका 'गोदू' हिचा उल्लेख केला जातो. 'गोदू गोखले' ह्या कादंबरीमध्ये वरेरकरांनी 'पात्रमुखी' प्रकारचा अवलंब केला आहे. स्त्री—पुरूषांच्या समतेचा एकांतिक पुरस्कार करण्याकरिता वरेरकरांनी 'गोदू' या पात्राची निर्मिती केलेली आहे.

'गोदू गोखले' या कादंबरीतून भामा वरेरकरांनी नायिका 'गोदू' हिच्या स्वभावातील बाल, तरूण व प्रौढ मनाचा स्वतंत्र अविष्कार दाखवला आहे. 'गोदू गोखले' ह्या कादंबरीमध्ये भामा वरेरकरांनी विवाह संस्थेसारख्या जीवनाच्या एका महत्त्वपूर्ण क्षेत्रात नव्या वैचारिक लाटेचा झपाटयाने प्रसार होत असल्यामुळे जुनी विचार व्यवस्था कोलमडून पडत आहे हे दाखवून दिले आहे.

'विधवाकुमारी' व 'गोदू गोखले' ह्या दोन कादंबऱ्याचा विचार करता दोन्हीही कादंबऱ्याच्या नायिका ह्या लहानपणापासूनच हुशार, अभ्यासू व चिकाटी त्यांच्या मध्ये दिसून येते. म्हणूनच त्या प्रत्येक संकटाला धैर्याने सामोऱ्या जातात. समाजाकडून त्यांचा छळ होत होता. तरी शिक्षणातून त्या आत्मोन्नतीचा मार्ग शोधतात. आपण दुसऱ्यासाठी काहीतरी केले पाहिजे ह्या जाणिवेने त्या आपआपल्या परीने समाजातील लोकांच्या विचारामध्ये बदल करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. भामा वरेरकरांच्या लेखनाची भाषा अतिशय साधी, सोपी व घरगुती वळणाची वाटते. म्हणूनच वाचकाला ती अपालीशी वाटते.

'विधवाकुमारी' कादंबरीचा परिणाम होऊन आज विधवा स्त्री ही विधवा असून ही कुंकू लावू लागली आहे. तर 'गोदू गोखले' कादंबरीचा परिणाम होऊन काही स्त्रिया ह्या लग्नानंतरही आपल्या माहेरचेच नाव लावणे पसंत करतात.

भामा वरेरकरांच्या कादंबऱ्या ह्या खऱ्या अर्थाने सामाजिक कांदबऱ्या आहेत. त्यातून भामा वरेरकरांनी अनेक प्रश्न हाताळले. परंतु भामा वरेरकरांनी प्रामुख्याने स्त्रीबद्दलचा विचार केलेला आहे. पुरूष शाहीला शह देण्याकरिता भामा वरेरकरांनी तेजस्वी व आक्रमक 'स्त्री' रंगविली आहे. पारंपरिकतेचे खूळ मोडून काढावे ही भामा वरेरकरांच्या कादंबऱ्यातील नायिकाची उपजत प्रवृत्ती आहे असे दिसते.

मामा वरेरकरांच्या कादंबऱ्यातील नायिका ह्या समानतेच्या पुरस्कर्त्या व कट्टर स्त्रीवादी आहेत.

मामा वरेरकरांच्या कादंबऱ्यातील स्त्रीसृष्टी विविध प्रकारची आहे. 'विधवाकुमारी' कांदबरीची नायिका 'मथू' ही एका मध्यमवर्गीय कुटूंबातील आहे. तर 'गोदू गोखले' कांदबरीची नायिका 'गोदू' ही एका संपन्न घराण्यातील मुलगी आहे. तिच्या मैत्रिणी बनी, यमू, छबी ह्याचा स्वभाव हा गोदूपेक्षा वेगळा आहे. 'विधवाकुमारी', व 'गोदू गोखले' कादंबऱ्यामध्ये मामा वरेरकरांनी मांडलेले विचार हे काळापुढचे होते म्हणूनच मामा वरेरकर हे पुरोगामी विचारसरणीचे लेखक होते असे म्हटले जाते.

'विधवाकुमारी' आणि 'गोदू गोखले' या कादंबऱ्यांच्या संदर्भात भा. वि. वरेरकरांच्या कादंबरीतील स्त्री—दर्शनाचा विचार करणे हा प्रस्तुत प्रबंधिकेचा मुख्य उद्देश आहे. त्यादृष्टीने प्रास्ताविकातून विषयनिवडीमागील भूमिका स्पष्ट केल्यानंतर भा. वि. वरेरकरांची वाङ्मयीन जडणघण कशी झाली तसेच त्यांची वाङ्मयीन वैशिष्टये कोणती याचा विचार दुसऱ्या प्रकरणात केला. तिसऱ्या प्रकरणात मामा वरेरकर पूर्व आणि मामा वरेरकर कालीन मराठी सामाजिक कादंबरीचा विचार प्रामुख्याने केला. या पार्श्वभूमीवर चौथ्या व पाचव्या प्रकरणात अनुक्रमे 'विधवाकुमारी' व 'गोदू गोखले' या कादंबऱ्यातील स्त्री दर्शनाची सविस्तर चर्चा केली. सहाव्या प्रकरणात कादंबरीकार मामा वरेरकरांचे स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न केला त्यावरून असे दिसते की, श्रेष्ठ कादंबरीकाराला आवश्यक असणारे गुण मामा वरेरकरांच्यात होते. पुरोगामि वृत्तीमुळे काळाच्या पुढे जाऊन विचार करण्याची क्षमता त्यांच्यात होती विशेषत: 'विधवाकुमारी' व 'गोदू गोखले' या कादंबऱ्यातून ज्याप्रकारे स्त्रियांचा बंडखोरीचे निशाण त्यांनी फडकवले त्यातून मामा वरेरकरांचे मोठेपण आपल्याला दिसून येते.

## भा. वि. वरेरकरांच्या स्वतंत्र कादंबऱ्यांची सूची

१. उघडझाप — मुंबई, १९३५
२. उमलती कळी — अधिकारी गोपाळ गोविंद, महाराष्ट्र शासन संस्था, १९३७
३. कुलदैवत — मौज प्रकाशन, मुंबई, फेब्रुवारी १९३५
४. गोदू गोखले (पूर्वाध) जोशी नरहर रामचंद्र, मौज प्रकाशन, मुंबई ऑगस्ट १९३२
५. गोदू गोखले (उत्तरार्ध) — पुणे मराठी ग्रंथालय, मुंबई १९३३
६. गीता — जोशी नरहर रामचंद्र — १९४०
७. चिमणी — नवलेखन, मुंबई, तिसरी आवृत्ती, १९६३
८. झुलता मनोरा — १९४६
९. तरते पोलाद — हिराजी मोहनजी, १९४०
१०. द्राविडी प्राणायाम — १९४४
११. तोंड मिळवणी — नवभारत प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९४४
१२. धावता धोटा — अभिनव प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९७२
१३. न पुजलेली देवता — हिरजी मोहनजी, १९४०
१४. परत भेट — सांपळे एस्. एन्. १९३४
१५. पेटते पाणी — लोटलीकर दिगंबर बापूजी, १९३९
१६. फाटकी वाकळ — हिरजी मोहनजी, १९४१
१७. भानगड गल्ली — नाडकर्णी ब्रह्मानंद, १९३९
१८. मलबार हिल अर्थात सौंगडी — १९३८
१९. लढाई नंतर — विद्या प्रकाशन, दिल्ली, १९४७
२०. मी रामजोशी — हिरजी मोहनजी, पहिली आवृत्ती, १९४३
२१. विकारी वात्सल्य — भागवत. पा. म, मुंबई, पहिली आवृत्ती, १९३६

२२. विधवाकुमारी — शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे, शाश्वत साहित्यमाला, तिसरी आवृत्ती, १९९३

२३. वेणू वेलणकर — १९३७

२४. शिपायाची बायको — हिरजी मोहनजी, मुंबई १९४३

२५. सात लाखातील एक — मुंबई, १९३७

२६. संसार की संन्यास — मुंबई, १९११

२७. स्थित्यंतर — ठाकूर ना. सु, पुणे, १९५४